दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ३६ वा | मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# फडणवीस सरकारला दोन दिवसांचा अल्टीमेटम, एकदा निघालो तर थांबणार नाही

## मनोज जरांगेंची डरकाळी, प्रश्न निकाली न लागल्यास इतिहास घडवणार

**बीड (कटूसत्य वृत्त):-** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील मराठा समाजाला ओबीसी प्रवगार्तून आरक्षण मिळावे यासाठी आक्रमक झाले आहेत. आरक्षणासाठी चलो मुंबई या त्यांच्या मोर्चाला सुरुवात केली आहे.

या मोचार्साठीची, आंदोलनाची तयारी सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. २७ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने मोर्चा रवाना होणार आहे. २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाड मैदानावर मनोज जरांगे पाटील हे मराठा आंदोलकांसह आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. आंदोलनाला सुरुवात होण्यापूर्वी आज (२५ ऑगस्ट) मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेतली.

या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी मोचार्चा आराखडा सांगितला. आरक्षणाची अंमलबजावणी झाल्याशिवाय मागे हटणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.



**मराठा आरक्षणाचा गुल्ला उधळूनच परतणार**

आम्हाला वाहतूक कोंडी करायला जायचे नाही. मुंबईमधील कोणताही एक रस्ता आम्हाला द्या. आम्हाला न्यायासाठी द्यायला जायचेय. कुणाला त्रास व्हायचा म्हणून आम्ही जात नाही. आम्ही चाकण मार्गे जात आहोत. कल्याण मार्गे जात नाही. आताच काही लोकं आझाद मैदानावर गेल्याचे समजलेय, असे मनोज जरांगे पाटील पत्रकार परिषदेमध्ये म्हटले.

जरांगे पाटील म्हणाले, 'आम्ही आमच्या मागण्यावर ठाम आहे. मराठा आणि कुणबी एक आहेत, हा जीआर आम्हाला मंजुरीसह हवाय. त्याशिवाय आम्ही मुंबई सोडणार नाही. हैदराबादचे गॅझेट आम्हाला लागू केलेले हवं आहे. त्यावर अभ्यास सुरू आहे, खोटी माहिती आम्ही ऐकूण घेणार नाही. १३ महिन्यापासून गॅझेटिवर अभ्यास सुरू आहे. आता आम्ही ऐकू शकत नाही. जर आमच्या नोंदी सापडल्या आहेत, तर ते आम्हाला हवंय.'

'तिन्ही गॅझेटियर लागू केले म्हणून कुणी आडवे येणार नाही. आम्ही त्याशिवाय हटणार नाही. ओबीसीचा विरोध करायचा कारण नाही. आमचा जमिनीचा सातबारा सापडला आहे, त्यामुळे आम्हाला देणं भाग आहे. फडणवीस यांनी मराठ्याचे विषय समजून घ्यावे. १० टक्के आरक्षण नकोय, आम्हाला हक्काचे घर हवे आहे. आम्हाला हक्काचे आरक्षण हवे आहे', असे वक्तव्य जरांगे पाटील यांनी केले आहे.

**जरांगे पाटील यांच्या मोचार्चा मार्ग**

२७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मुंबईसाठी निघणार. जुन्नरमध्ये मुक्काम असेल. २८ ऑगस्ट रोजी शिवनेरी गडाचे दर्शन घेऊन, राजगुरू खेड मार्गे चाकणला. चाकणहून तळेगाव लोणावळा, पनवेल, वाशी २८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी आझाद मैदान २९ ऑगस्ट रोजी आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू

पहिला मुक्काम शिवनेरीवर मनोज जरांगे पाटलांनी मुंबईला जाण्याचा मार्ग सांगितला आहे. 27 तारखेला आंतरवाली सराटी मधून आम्ही बाहेर पडणार आहोत पैठण, शेवगाव, पांढरीपुल, अहिल्यानगर, आळेफाटा आणि त्यानंतर रात्रीचा मुक्काम शिवनेरी किल्ल्यावर राहील. 26 तारखेच्या आत अंमलबजावणी केली तर ठीक आहे, अन्यथा एकदा अंतरवाली सराटी सोडली तर नंतर चर्चा करणार नाही. थेट मुंबईमध्ये गेल्यावर चर्चा करू असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, 'सरकारला मराठ्यांना आरक्षण द्यायचं नाहीये, फक्त त्यांना काहीतरी कुरापती उकरून काढायच्या आहेत. आरक्षण द्यायची वेळ आली तर आता फडणवीस आईला पुढे करत आहे. त्यांच्या आईला काही शब्द बोललो असेल तर ते मी ते विधान मागे घेतलेले आहे. मराठ्यांना आरक्षण द्यायचं नाही, मुंबईत येऊ द्यायचं नाही.'

## 'पंढरपुरात कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे'; खून मारामाऱ्या खंडणी यासारख्या प्रकारांमध्ये वाढ

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** समतेचा आणि शांतीचा संदेश देणाऱ्या पंढरी नगरीमध्ये आता खून, मारामाऱ्या आणि खंडणी या सारख्या गुन्हेगारी प्रकारांना उत आला आहे. दररोज घडणाऱ्या अशा घटनांमुळे पंढरपुरातील कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाल्याचे दिसून येत आहे. अशा वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे पंढरपुरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान पोलिसांकडून वेळीच कडक कारवाई होत नसल्याने गुन्हेगारांचे धाडस आणखी वाढत असल्याची लोकांमध्ये चर्चा आहे.

अशातच ऐन गौरी गणपती सणाच्या तोंडावर आज पुन्हा एकदा शहरातील भर चौकामध्ये एका तरुणावर कोयत्याने वार करून जखमी केल्याची घटना समोर आली आहे. शहरातील वाढत्या घटनांमुळे पंढरपुरातील पोलिस करताय तरी काय? असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.

मागील एक दीड महिन्यात खून, मारामाऱ्या या सारख्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नव्यानेच आलेले उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या कार्यक्षमतेवर ही आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.15 जुलै रोजी पंढरपूर शहरातील शिंदे नाईक नगर मध्ये राहणाऱ्या लखन जगताप आणि सुरेखा जगताप या माय लेकरांची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली.

या घटनेला जवळपास दीड महिना उलटून गेल्यानंतरही अद्याप पोलिसांना तपास लागला नाही. या घटनेनंतरही शहरात अशा अनेक हाणामारीच्या घटना घडलेल्या आहेत. शुक्रवारी (ता.22) शहरातील संत गजानन महाराज मठाजवळ श्रेयश धर्मा पवार या अल्पवयीन तरुणावर धारदार कोयत्याने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान पुन्हा रविवारी (ता.24) भर दुपारी कालिकादेवी चौकामध्ये एका तरुणावर कोयत्याने वार करून जखमी केल्याची गंभीर घटना घडली आहे. शहरात कोयता गॅंग सक्रिय झाल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आठ दिवसांपूर्वी डॉल्बीच्या कर्ण कर्कश आवाजामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेलाही आठ दिवस उलटून गेले आहेत. तरीही मृत्यू झालेली व्यक्ती कोण याचाही तपास पोलिसांना लागला नाही.

सध्या पंढरपूर शहरांमध्ये अवैध वाळू उपसा, जुगार, मटका, गुटखा ,मावा यासारखे अवैध धंदे राजरोसपणे सुरू आहेत. लोकप्रतिनिधींना खंडणी मागण्यापर्यंत आरोपीचे धाडस वाढले आहे.

अशा अनेक गुन्हेगारी घटनांमुळे पंढरपूरची प्रतिमा डागळू लागल्याची चर्चा सुरू आहे. पंढरपुरात दररोज हजारो भाविक विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात अशावेळी शहरातील कायदा सुव्यवस्था उत्तम नसेल तर भविष्यात पंढरपुरात येणाऱ्या भाविकांच्या संख्येवर देखील परिणाम होण्याची शक्यता आहे पंढरपूर शहरातील कायदा सुव्यवस्था चोखपणे राखण्यासाठी कडक शिस्तीच्या अधिकाऱ्यांची या ठिकाणी पाठवणी करावी अशी मागणी ही आता सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.

## सोलापूर जिल्ह्यातून मराठा आरक्षण आंदोलनासाठी 25 हजार गाड्या जाणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी तमाम महाराष्ट्रातील मराठा बांधवानी या आंदोलनासाठी मुंबईला येण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत सोलापूर जिल्ह्यातून सकल मराठा समाज सोलापूर शहर व जिल्ह्यातून सुमारे 25 हजार दु-चाकी, चार-चाकी मालवाहतुकीचे वाहने ट्रक्टर, पाण्याचे टँकर व ॲब्युलन्स घेऊन समाज बांधव मुंबईच्या दिशेने गुरुवार दि. 28 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन मुंबईच्या दिशेने निघणार आहेत,



अशी माहिती सकल मराठा समाज सोलापूर शहर व जिल्हाचे माऊली पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. सरकारने सगेसोयरेची अधिसूचना काढून कायद्यात रूपांतर करण्याचे मान्य केले होते.हैदराबाद, सातारा आणि बॉम्बे गैझेट अभ्यास करून लागू करण्याची भूमिका देखील सरकारनेच घेतली होती.

यामुळे यामध्ये आता सरकारनेच भूमिका घेऊन हा प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. मराठा समाजाची ओबीसी आरक्षणाची मागणी असताना सरकारने एसईबीसी हा ओबीसी अंतर्गत प्रवर्ग बनवून 10 टक्के आरक्षण देणे आवश्यक होते मात्र सरकारने जाणीवपूर्वक ओबीसी बाहेरील घटनाबाह्य व बेकायदेशीर प्रवर्ग बनवून फसवे आरक्षण दिले आहे. ओबीसी तरुणांवर आंदोलनात दाखल गुन्हे सरकारने तात्काळ मागे घेतले मात्र मराठा आंदोलकांच्यावर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याचा निर्णय झालेला असताना त्यांच्यावर खटले भरले आहेत.

ओबीसीना शालेय व उच्च माध्यमिक व पदवी शिक्षणासाठी जवळपास 7200 कोटी रुपये दिले जातात तर मराठा समाजाला फक्त 200 ते 300 कोटी दिलेले जातात. अण्णासाहेब पाटील महामंडळ 1.5 लाख तरुणाना कर्ज भेटले मात्र ते गेल्या 7 वर्षात सध्या सरकार चार - चार महीने व्याज परतावा देत नाही व बँका कर्ज देण्यास टाळाटाळ करतात. 15 ते 16 लाख तरुणानी 7 वर्षात अर्ज केल्यावर 1.50 लाख लोकांना कर्ज भेटले आहे हे वास्तव आहे, असा आरोप माऊली पवार यांनी केला आहे.

मराठा तरुणांच्यासाठी कुठे ही वस्तीगृह नाहीत उलट ज्या-ठिकाणी मराठा समाजाची मागणी आहे त्या जागा जाणिवपूर्वक ओबीसी वस्तीगृहासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आलाय. ओबीसी विद्यार्थी सरकारी व खाजगी शाळेत 50 टक्के मध्ये प्रवेश घेतात तर मराठा समाजाला आरक्षण मिळून देखील 100 टक्के फी भरावी लागते.

सध्या सरकारने निधी अडवला असल्याने सारथी संस्थेच्या अनेक योजना बंद असल्याने विद्यार्थी अडचणीत आले आहेत.

आयोगाने मराठा समाजाला मागास ठरवून देखील खुल्या प्रवर्गात गुणवतेवर मिळत असलेल्या 9 टक्के जागा 10 टक्के % आरक्षण म्हणून दिल्या आहेत. या उलट 33.80 टक्के समाजाला 32 टक्के आरक्षण सुरु ठेवून मराठा आणि इतर जातीवर अन्याय केला आहे.

समाजाच्या विविध मागण्या तत्काळ मंजूर कराव्यात, अशी मागणी यावेळी माऊली पवार यांनी केली आहे.

या पत्रकार परिषदेस डॉ. प्रमोद पाटील, सचिन तिकटे , राजन जाधव, ॲड. श्रीरंग लाळे आदी उपस्थित होते.

## मिरवणुकांमध्ये प्लाझमा, बीम लाईट, लेझर बीम लाईटच्या वापरास प्रतिबंध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय नागरिक संरक्षण संहिता 2023 चे कलम 163 (1) अन्वये प्राप्त अधिकारानुसार पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी सोलापूर शहर हद्दीत दि. 27 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 6.00 वाजल्यापासून ते दिनांक 7 सप्टेंबर 2025 रोजीचे रात्री 12 वाजेपर्यंत सोलापूर शहरात सर्व प्रकारच्या मिरवणुकांमध्ये व्यक्ती, समुदाय, मंडळ यांच्यामार्फत प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटच्या (Plasma, Laser beam light, Beam light) वापरास प्रतिबंध केला असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

सोलापूर शहरात दि. 27 ऑगस्ट 2025 ते 6 सप्टेंबर 2025 या कालावधीत गणेशोत्सव व दि. 7 सप्टेंबर 2025 रोजी ईद-ए-मिलाद

(महंमद पैगंबर जयंती) हा सण साजरा केला जाणार आहे. तसेच शहरामध्ये तीन दिवस, पाच दिवस, सात दिवस, नऊ दिवस आणि अनंत चतुर्दशी या दिवशी श्री. गणेश मुतीर्चे विसर्जन करण्यात येतात. या कालावधीत मोठ्या प्रमाणात मिरवणुका होतात. या मिरवणुकांमध्ये प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईट्सचा मोठ्या प्रमाणात वापर करतात.

प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटच्या प्रखर प्रकाशामुळे रस्त्यावरून जाणारे वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून वाहन मिरवणुकीमध्ये जावू शकते व त्यामुळे अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच मिरवणुकीमध्ये सहभागी झालेले व मिरवणूक पाहण्यास आलेली लहान मुले, वयोवृध्द, जेष्ठ नागरिक, सामान्य नागरिक यांच्या डोळ्यास इजा होवून त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

या आदेशाचा कोणी कोणत्याही प्रकारे भंग केल्यास, ती व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल असेही आदेशात म्हटले आहे.





निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO DARPAN
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार
नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## अतिवृष्टी पूरपरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा - पालकमंत्री गोरे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात मागील काही दिवसापासून अतिवृष्टी, व सततचा पाऊस तसेच उजनी व वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये सातत्याने वाढ होत होती .धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग निरा , भीमा व सीना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला होता. जिल्ह्यात अतिवृष्टी व पूरपरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा. पंचनामे करतांना एकही नुकसानग्रस्त शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

जिल्ह्यातील अतिवृष्टी व पूरपरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीबाबतची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे घेण्यात आली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे , जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप



जंगम, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले प्रांत अधिकारी सदाशिव पडदुने , सुमित शिंदे, सचिन इथापे, विजया पांगारकर तंत्र अधिकारी सतीश देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अभियंता खांडेकर तसेच सर्व तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यावेळी उपस्थित होते .

यावेळी पालकमंत्री गोरे म्हणाले, अतिवृष्टी व पूरपरस्थितीमुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यासाठी विविध यंत्रणेनुसार तातडीने पंचनामे सुरू करावेत. पाऊस आणि पुराच्या पाण्याने जिल्ह्यातील नुकसान झालेल्या भागातील शेती, घरे, व जनावरांचे तातडीने पंचनामे सुरु करावेत. या अतिवृष्टीमध्ये जीवित व वित्तहानीची परिपूर्ण माहिती तयार करावी. या कामासाठी आवश्यकतेनुसार गटविकास अधिकारी, कृषि सहाय्यक, ग्रामसेवक, तलाठी व इतर तालुकास्तरीय अधिकारी-कर्मचारी यांची पथके गठीत करून पंचनामे कालमयार्देत पूर्ण करावेत व त्याचा अहवाल शासनाकडे पाठवावा. राज्य सरकार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे, तसेच पुरस्थितीमुळे काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित झाले असल्याची शक्यता आहे, त्याठिकाणी आवश्यक उपाययोजना कराव्यात त्याचबरोबर पूरग्रस्त भागात (पान 2 वर..)

## संपादकीय

# विरोधकांची एकजूट

30 दिवस तुरुंगात राहिल्यानंतर पद आपोआप जाणार असल्याची तरतूद असलेलं विधेयक संसदेत आणलं आहे. मात्र, हाच नियम पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनाही लागू राहणार आहे. मग रडारवर विरोधकच कसे? संसदेचं पावसाळी अधिवेशन संपलं आहे. लोकसभा आणि राज्यसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहात गोंधळ घालण्यात आला. कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या निवडणुकीत मतांची चोरी झाली आणि बिहारमध्ये मतदार यादीचा गहन फेरआढावा या दोन मुद्द्यांवर विरोधी पक्षांनी अक्षरशः रान माजवलं. विरोधकांच्या तोफा केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर महिनाभर मारा करीत आहेत.एक मात्र नक्की की, देशभरातील तमाम विरोधी पक्षांची आता सरकारच्या विरोधात एकजूट झाली आहे. पावसाळी अधिवेशनाने याची झलकही दिसून आली. निवडणूक आयोगाने केलेल्या एसआयआरमुळे विरोधकांना एकजूट होण्याची संधी दिली. एसआयआरचा मुद्दा चर्चेत आला नव्हता तेव्हा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष इंडिया आघाडीपासून चार हात लांब होते.

मात्र, निवडणूक आयोगाने एसआयआरची प्रक्रिया सुरू केली आणि विरोधकांमधील अंतर हळूहळू कमी होत गेले. अधिवेशनात हे अंतर पूर्णपणे मिटले आणि तमाम विरोधी पक्षांची एक साखळी तयार झाली. निवडणूक आयोगाची भूमिका, एसआयआर आणि उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीने विरोधी पक्षांना एका सूत्रात बांधण्याचं काम केलं. विरोधी पक्षाचं नेतृत्व काँग्रेसकडे असल्यामुळे सुरुवातीला ममता दिदी अस्वस्थ होत्या. पण ज्याप्रमाणे घटनाक्रम घडत गेला दिल्लीत काँग्रेसचा विरोध करण्यापेक्षा इंडिया आघाडीशी जुळवून घेणेच योग्य वाटू लागले आणि त्या आघाडीत केवळ सामील झाल्या नाहीत तर आक्रमकसुद्धा झाल्या. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याबाबतही असेच घडलं. इंडिया आघाडीपासून ते लांब होते. मात्र, ऑपरेशन सिंदूर आणि एसआयआरवरील चर्चा असो किंवा उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी उमेदवार ठरविण्याचा मुद्दा असो 'आप'ने वेगळी चूल मांडण्याऐवजी आघाडीसोबत राहणे पसंत केले. सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात 9 तारखेला उपराष्ट्रपतिपदासाठी निवडणूक होणार आहे. यासाठी रालोआचे उमेदवार राधाकृष्णन आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी मतांचा जोगवा मागण्यासाठी फिरत आहेत. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेचे खासदारच मतदान करतात. यामुळे या निवडणुकीत राधाकृष्णन यांचा विजय जवळपास निश्चित असला तरी आघाडीचे उमेदवार मोठ्या हिमतीने मैदानात उतरले आहेत. सर्व विरोधी पक्षही एकजुटीने लढत आहेत. रालोआचा विजय निश्चित असला तरी भाजप हातावर हात ठेवून शांत बसणार असं म्हणणे भाबडेपणा ठरेल. इंडिया आघाडीच्या मतांमध्ये फूट पाडून त्यांची मतं राधाकृष्णन यांना कशी मिळतील याची गोळाबेरीज सध्या भाजपचे रणनीतिकार करीत आहेत. महाराष्ट्रातील उमेश म्हेत्रे यांच्यासह देशभरातील 46 उमेदवारांची उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक लढण्याची इच्छा होती. त्यांनी अर्जसुद्धा भरले. मात्र, रालोआ आणि इंडिया आघाडीच्या उमेदवारांव्यतिरिक्त सर्वांचे अर्ज अवैध ठरले. या हौशी कलावंतांचा भ्रमनिरास झाला असला तरी सरकारच्या तिजोरीत हजारो रुपयांची भर पडली आहे. आता सी पी राधाकृष्णन आणि बी. सुदर्शन रेड्डी यांच्यातच कुस्ती रंगणार आहे. संसदेत रालोआचे संख्याबळ पुरेसे आहे. यामुळे राधाकृष्णन यांचा विजय होणे स्वाभाविक आहे. परंतु, निकाल लागत नाही तोपर्यंत कुणीही हरलेला नसतो. अशातच, भाजप आणि काँग्रेसमधील रणनीतिकारांना त्यांच्या चाणक्यनीतीवर भरवसा आहे. दोन्ही पक्ष इंडिया आघाडी आणि रालोआच्या मतांमध्ये फूड पाडण्याचा प्रयत्न त आहेत. सध्या दोन्ही आघाडीतील नेत्यांनी भावनिक डाव खेळला आहे. परंतु, हळूहळू एकमेकांची मते फोडण्याचे प्रयत्न केले जातील. भाजपने तामिळनाडूतील राधाकृष्णन यांना उमेदवारी देऊन द्रमुकला इंडिया आघाडीपासून वेगळे करण्याचा डाव खेळला आहे. तर, तेलंगणातील रेड्डी यांच्या माध्यमातून काँग्रेसकडून रालोआचे घटक पक्ष तेलुगु देसम पक्ष आणि वायएसआर यांना भाषेच्या आधारावर फोडण्याचा प्रयत्न करीत आहे. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचे चिरंजीव आणि टीडीपीचे महासचिव नारा लोकेश यांनी एनडीए मजबूत असल्याची पोस्ट करून काँग्रेसच्या प्रयत्नांवर विरजण सोडण्याचा प्रयत्न केला आहे. तर, डीएमकेनेसुद्धा इंडिया आघाडीत असल्याची कबुली दिली आहे. रालोआने राधाकृष्णन यांना उमेदवारी देणे हा राजकीय डाव असून त्याकडे भाषेच्या दृष्टिकोनातून बघितले जाऊ नये असे म्हटले आहे. रालोआ आणि इंडिया आघाडी यापैकी कोण कुणाच्या मतांमध्ये फूट पाडतो हे 9 सप्टेबरला स्पष्ट होईल. परंतु, भाजप शांत बसणारा पक्ष नाही याची जाणीव असल्यामुळे काँग्रेस सतर्क आहे.

गेल्या दोन अधिवेशनांत विरोधी पक्षांमध्ये फूट असल्याचे चित्र दिसून येत होते. 2024 च्या लोकसभा निवडणुकीनंतर 232 जागा मिळवून विरोधी पक्ष पुढे आला. इंडिया आघाडीने 18 व्या लोकसभेच्या पहिल्या पावसाळी अधिवेशनात आपल्या एकतेची जाणीव सरकारला करून दिली होती. मात्र, हरियाणा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर आणि मागील हिवाळी अधिवेशन तसेच अर्थसंकल्पीय अधिवेशनात टीएमसी आणि आप हे दोन पक्ष इंडिया आघाडीपासून दूर गेल्याचे दिसून आले होते.

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत तर काँग्रेस आणि आप यांच्यातच खडाजंगी रंगली होती. दोन्ही पक्षांनी एकमेकांवर हल्ला चढविला. परंतु निवडणूक आयोगाने 24 जूनपासून बिहारमध्ये अचानक एसआयआर करण्याच्या निर्णयामुळे विरोधी पक्षांना त्यांचे मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याचा मार्ग मोकळा झाला आणि पावसाळी अधिवेशन त्याचे व्यासपीठ बनले. विरोधकांमध्ये परस्पर विश्वास निर्माण झाल्याचा परिणाम म्हणजे ऑपरेशन सिंदूरवरील संसदेत झालेल्या चर्चेदरम्यान इंडिया आघाडीतील पक्षांनी सत्ताधारी पक्षाला एकतर्फी कथन करण्याची संधी दिली नाही. यानंतर, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बेंगळुरू मध्य लोकसभा मतदारसंघातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघातील एक लाखाहून अधिक बनावट मतदारांचा मुद्दा उपस्थित करून आणि मतचोरीचा दावा करून एसआयआर वादाची ठिणगी आणखी पेटवली. या दाव्यानंतर, संसदेपासून रस्त्यावरील जमिनीवरील लढाईत सर्व विरोधी पक्ष राहुल गांधींसोबत खंबीरपणे उभे असल्याचे दिसून आले.

पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षांच्या चचेर्ला तोंड देण्यासाठी सरकारने पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना अटक केल्यानंतर त्यांना बडतर्फ करण्यासाठी लोकसभेत विधेयक मांडले. यामुळे विरोधकांची एकजूट आणखी पक्की झाली. एसआयआर, उपराष्ट्रपतिपदाची निवडणुकीत, निवडणूक आयोगाची भूमिका आणि त्यात संसदेत आणलेले हे विधेयक. यामुळे विरोधक एकजूट राहण्यावर आणखी ठाम झाले आहेत. महत्त्वाचं म्हणजे, विरोधकांचा काटा काढण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं असल्याची चर्चा आहे. खास करून आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या पक्षातील नेत्यांचा बंदोबस्त करण्यासाठी.

कार्यकारी संस्था अर्थात ईडी, सीबीआय, पोलीस किंवा अन्य कोणत्याही संस्थेने कुणाला अटक केली आणि ते सलग 30 दिवसांपर्यंत कोठडीत राहिलेत तर 31 व्या दिवशी ते ज्या पदावर आहेत ते आपोआप जाईल अशी तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. विरोधकांच्या विरोधाची धार बोथट करण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं आहे असा आरोप होतो आहे. परंतु, यात दस्तुरखुद्द पंतप्रधान आणि राज्यांचे मुख्यमंत्रीसुद्धा या विधेयकाच्या कक्षेत येतात. यामुळे, हे विधेयक विरोधकांसाठीच आहे असं म्हणणं चुकीचं होईल. कारण यात पंतप्रधान आणि मुख्यमंत्रीसुद्धा सामील आहेत. मात्र भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्याविरोधात याचा वापर होणार का, असा प्रश्न पुढे येतो.

# शहरांचे योग्य नियोजन करा नाही तर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना

मुसळधार पावसाने मुंबईसह नवीमुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यात हाहाकार उडवला. मुंबई उपनगरात २४ तासात २३८.२ मिलिमीटर पाऊस झाला तर ठाणे शहरात १३३ मिलिमीटर पाऊस पडला. मुंबई शहरातही ११० मिलिमीटर इतका पाऊस झाला. कोकणातही पावसाने अशीच तडाखेबंद हजेरी लावली. केवळ मुंबई, ठाणे आणि कोकणच नव्हे तर संपूर्ण राज्यात पावसाने दाणादाण उडवली. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. नाशिकमध्येही पावसाने कहर केला. विदर्भात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना पावसाने तडाखा दिला तीच परिस्थिती मराठवाड्यातही झाली एकूणच पावसाने सपूर्ण राज्यात कहर केला. गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने असे रौद्ररूप धारण केले की सर्वांचीच पाचावर धारण बसली. या पावसाने मोठ्या प्रमाणात वित्तहानी तर झालीच पण काही ठिकाणी जीवितहानी देखील झाली. काहींना आपला जीव देखील गमवावा लागला. नद्या, नाल्यांना पूर आला. अनेकांचा संसार पाण्यात बुडाला, शेतीवाडी पाण्याखाली गेल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने बळीराजा हताश झाला. क्षणात होत्याचे नव्हते झाले. देशाची आर्थिक राजधानी असलेली आणि कधीही न थांबणारी मुंबईही या पावसाने काही काळ ठप्प झाली. या पावसाने मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली. जोरदार पावसाने मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले. शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. पावसामुळे शासकीय आणि अशासकीय कर्मचाऱ्यांना देखील शासनाने सुट्टी दिली. जागोजागी पाणी तुंबल्याने रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले. लोकांच्या घरात पाणी आले. त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. शेकडो गाड्या जाग्यावरच थांबल्या त्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. काही ठिकाणी दरड कोसळल्याने महामार्ग बंद झाले. रेल्वे मार्गावर पाणी साचून रुळ पाण्याखाली गेल्याने लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या. लांब पल्ल्याच्या गाड्याच नाही तर अनेक लोकलही रद्द कराव्या लागल्या. काही मार्गावर धीम्या गतीने लोकल सोडाव्या लागल्या. पावसाचे पाणी रेल्वे स्थानकावरून धबधब्याप्रमाणे ओसंडून वाहत होते. पावसामुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने मोनोरेल जाग्यावरच थांबली. त्यात शेकडो प्रवासी अडकले. आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशामक जवानांच्या पथकाने आपली जबाबदारी चोख पार पडल्याने प्रवाशांची सुरक्षित सुटका झाली. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणूनच प्रवाशांचा जीव वाचला. या पावसाने २६ जुलै २००५ ला मुंबईत झालेल्या पावसाची आठवण करून दिली.

त्यावेळी झालेल्या पावसात देखील मुंबईची अशीच अवस्था झाली होती. २६ जुलैच्या पावसानंतर आपण कोणताही धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. २६ जुलैला निसगार्ने शहरांचे योग्य नियोजन करा नाहीतर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना असा इशारा देऊन धडा शिकवला होता तरीही त्यातून आपण काहीही शिकलो नसल्याने दरवर्षी ये रे माज्या मागल्या असेच चालू आहे. शहरीकरण करताना नागरी नियोजनाची आखणी न केल्याने शहरांच्या सीमा वाढत गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. नियोजनाचा आराखडा तयार न करता कागदावरील नकाशाच्या सीमा वाढवून महानगराची मांडणी करणारे शासन आणि प्रशासन याला जबाबदार आहे. मुंबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या सीमा विस्तारित चालल्या आहेत. या शहरात दरवर्षी नव्या गावांची भर पडत आहे. नगर नियोजनाकडे गांभीर्याने न पाहता नागरीकरणाचा निर्णय घेतल्याने ही पूरस्थिती निर्माण झाली. शहरांच्या विस्तारण्याच्या शहरीकरणात पर्जन्यवाहिन्या, मलनिस्सारन अशा विविध विभागांचे एकत्रीकरण करून नियोजनाची मांडणी करण्याची प्राथमिकताही पूर्ण केली जाते का असाही प्रश्न निर्माण होतो. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि एमएमआरडीए यांचा एकत्र मेळ बसत नसल्याने शहरांचे नियोजन कोलमडत आहे. उघडी गटारी, तुंबलेले नाले, अनधिकृत बांधकामे, अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या, सिमेंटची वाढती जंगले, सिमेंटची रस्ते, जागोजागी बसवलेली पेव्हिंग ब्लॉक्स या सर्वांचा एकत्रित परिपाक म्हणजे ही पूरस्थिती. सरकारने आतातरी जागे होऊन शहर नियोजनाचा योग्य निर्णय घ्यावा अन्यथा भविष्यात यापेक्षाही भीषण परिस्थितीला सामोरे जावे लागेल.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# सण उत्सवाच्या काळात वाहतूक कारवाईत शिथिलता द्या- संभाजी ब्रिगेड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)ः-** सोलापूर शहरात आगामी काळात गणेश उत्सव गौरी आगमन नवरात्र महोत्सव दिवाळी हे सण तोंडावर आले आहेत त्यामुळे पुरुष महिला खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडत आहेत पण चौकाचौकात वाहतूक पोलीस कागदपत्रे तपासणीच्या नावाखाली नागरिकांची अडवणूक करून मोठ्या प्रमाणात दंड वसुली करीत आहेत त्यामुळे नागरिकात वाहतूक पोलिसाबाबत रोष निर्माण होत आहे तरी किमान सणासुदीच्या काळामध्ये वाहतूक नियम मात शिथिलता देण्यात येऊन वाहतुक कारवाई पासून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने पोलीस उपयुक्त मुख्यालय गौहर हसन यांच्याकडे करण्यात आली आहे. आगामी काळामध्ये मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव गौरी आगमन नवरात्रोत्सव अशी मोठी सण उत्सव साजरा करण्यात येणार आहेत शासनाचे असे निर्णय आहेत की सहन उत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्यात यावा या येर्णाया सणासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी पुरुषाबरोबर महिलावर्ग मोठ्या प्रमाणात बाहेर पडतात त्यांच्याबरोबर लहान मुलं सुद्धा असतात अशा वेळी चौकाचौकांमध्ये वाहतूक पोलीस त्यांना अडवून मोठ्या प्रमाणात दंडाची रक्कम वसुली करीत आहेत अशा वेळी महिला वर्गाकडे पैसे असतात नसतात त्या कारवाईच्या भीतीने रडकुंडीला येऊन विनंती केली तरी वाहतूक पोलीस कारवाई करतात काही ठिकाणी हे वाहतूक पोलीस आपल्या पर्सनल मोबाईल मध्ये वाहनांचे फोटो काढून दंड आकारणी करीत आहेत अशा वाहतूक पोलीस कर्मचारी वर कारवाई करण्यात यावे वाहतू पोलिसांनी चौकातील वर्दळीच्या ठिकाणी वाहतुकीचे नियमन करणे गरजेचे असून त्याकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसत आहे काही चौकाचौका गल्ली गल्लीमध्ये चार-पाच वाहतूक पोलीस नागरिकाकडून कारवाईच्या नावाखाली दंड आकारणी करताना दिसतात शहरांमध्ये सध्या सण उत्सव दिवस असल्यामुळे प्रत्येक बाजारपेठ मुख्य चौकात वाहनांच्या वर्दळ मुळे वाहतूक खोळंबा होत आहे त्यामुळे अशा गर्दीच्या ठिकाणी जास्तीत जास्त वाहतूक पोलिसांची नेमणूक करून वाहतूक सुरळीत होण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.यावेळी संभाजी ब्रिगेड चे श्याम कदम वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम जिल्हा उपाध्यक्ष दिलीप निंबाळकर शहर उपप्रमुख फिरोज सय्यद इलियास शेख बालाजी काकडे आधी उपस्थित होते.

पान १ वरून

## अतिवृष्टी पूरपरस्थितीमुळे.....

आरोग्यविषयक आजार होणार नाहीत यासाठी खबरदारी घ्यावी अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले. तसेच पंढरपूर तालुक्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे स्थलांतरित कुटुंबाच्या मदतीबाबत माहिती त्यांनी यावेळी घेतली यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्ह्यात अतिवृष्टी व पूरपरस्थितीमुळे नुकसानीबाबतची तसेच .उजनी धरणात येणाऱ्या पावसाच्या पाण्याची व विसर्ग होणाऱ्या पाण्याची माहिती दिली . त्याचबरोबर अतिवृष्टी व पूरपरस्थितीमुळे निमार्ण झालेल्या परस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासनाकडून करण्यात आलेल्या उपययोजनाची माहिती दिली. जिल्ह्यात 47 हजार 804 हेक्टर पिकांचे नुकसान जिल्ह्यात दि.01 ऑगस्ट पासून आतापर्यंत अतिवृष्टी व पूरपरस्थितीमुळे 172 गावे व 46 हजार 348 शेतकरी बाधित झाले आहे. या शेतकऱ्यांचे 47 हजार 804.34 हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. त्यात सर्वाधिक दक्षिण सोलापूर तालुक्यातील 18 हजार 471 हेक्टरचे नुकसान झाले. त्यापाठोपाठ उत्तर सोलापूर तालुक्यातील 14 हजार 04 , माढा तालुक्यात 8 हजार 721 तर पंढरपूर तालुक्यातील 5295 हेक्टरवर नुकसान झाले आहे. पुरस्थितीत 03 जनावरे दगावली तर अक्कलकोट 45, दक्षिण सोलापूर 02 व माळशिरस 01 अशा 48 घरांची पडझड झाली आहे. जिल्ह्यात उत्तर सोलापूर तालुक्यातील सोलापूर, शेळगी, मार्डी, वडाळा, तिर्हे तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी, मुस्ती व अक्कलकोट तालुक्यातील किणी मंडळात अतिवृष्टी झालेली आहे.

## वात्रटिका

### मुंबईच्या दिशेने

चल चल र गड्या आता
तुला मुंबई दाखवतो...
कोणी बघत बसतो आणि
कोण अडतो कोण नडतो...
सुटलं वादळ आणि गाड्या
तोडगा काही निघायला हवा...
विघ्नहर्ता येतोय लवकर
तुलाच साकडे घालतो देवा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

## प्रबोधन

# जगी आहे मोठी । संख्या आंधळ्यांची

'जगात आंधळेच फार आहेत' असं एकदा बिरबलाने अकबराला ऐकवलं. तेव्हा बादशहाने ते सिध्द करायला सांगितलं. बिरबल अकबराला एका विणकराच्या दुकानात घेऊन गेला. विणकर कापड विणत असताना एक जण तिथे येऊन म्हणाला, 'काय चाललंय, सदोबा ?' सदोबा म्हणाला, 'बसलोय विणत.' थोड्या वेळाने दुसरा आला. तोही म्हणाला, 'काय चाललंय ?' सदोबाने पुन्हा तेच उत्तर दिलं. तासाभरात दहाजणांनी 'काय चाललंय ?' हा प्रश्न सदोबाला विचारल्यावर बिरबल म्हणाला, 'खाविंद, सदोबा विणतोय हे पाहूनही सर्वजण विचारतायत, 'काय चाललंय ?' म्हणजे ती आंधळीच नाहीत काय? बादशहाने बिरबलाचं तत्त्व मान्य केलं.

मराठी साहित्यात दिवाकर कृष्ण नावाचे एक कथालेखक होऊन गेले. त्यांची 'अंगणातला पोपट' ही गोष्ट मराठी साहित्यातील एक अलंकार मानली जाते. ही गोष्ट संपत्तीच्या हव्यासाने आंधळ्या झालेल्या बापावर आधारलेली आहे. आईविना पोरका, एकुलता एक बच्चा 'पोपट' पितृसुख तरी मिळावं म्हणून पैशाच्या आकडेमोडीत गुंतलेल्या बापाच्या दारात तिष्ठतो. पण चार वेळा प्रयत्न करूनही वडिलांची भेट मिळत नाही म्हणून माज्यावर सारेच रागावलेत असं म्हणत तापाने फणफणतो व हे जग सोडून हा पोपट कायमचा अज्ञातात मिसळून जातो. आंधळ्या वृत्तीने घेतलेला हा निरागस बळी वाचकांना असह्य दुःख देतो. पोपटच्या वडिलांसारखे कितीतरी आंधळे रोज भेटतात. म्हणजे बिरबल म्हणाला ते काही खोटं नव्हतं.

जन्मांध हा प्रकार निसर्गजन्य असतो, पण सत्तांध, कामांध, मदांध, स्वार्थांध, धनांध, जात्यांध, तत्त्वांध, निष्ठांध हे अंधप्रकार मात्र समाज आणि परिस्थितीजन्य आहेत. यातील काही शब्द रूढ, परिचित आहेत. तर सत्तांध, कामांध, मदांध, स्वार्थांध हे प्रकार मानवी मनाच्या विकृतीवर आधारलेले नवसंस्कृतीजन्य आहेत.

जीवनाच्या निकोपपणाचा बळी घेणाऱ्या काही विकृतींचा नव्याने शोध लागतो. तात्त्विकपणा किंवा तत्त्वनिष्ठा हा परंपरेने सद्गुण मानला असला, तरी तत्त्वानेही काही माणसं अंध होतात. स्वदेशीचा प्रचार महात्माजींनी केला, तेव्हा अनेक देशभक्तांनी इंग्लंडहून येणारे चहा, कॉफी, चप्पल-बूट, घड्याळ सारे सोडले! इंग्लंडच्या गिरणीतून येणारं कापड, अगदी मँचेस्टरचं मांजरपाटही वापरणं सोडलं. चादर-ब्लँकेट विदेशी म्हणून टाकून, देशी घोंगडी अंथरायला-पांघरायला घेतली. मेड इन इंग्लंड छापाच्या छत्र्याही टाकल्या. पावसाळ्यात हे तत्त्वनिष्ठ लोक घोंगडीची खोळ करून पावसापासून आपला बचाव करायचे. साखर आपल्या देशात होत नव्हती म्हणून गुळाचा चहा प्यायचे. त्यांची स्वदेशीनिष्ठा अशी प्रखर झालेली असतानाच देशाला स्वातंत्र्य मिळालं. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरूंनी उद्योगधंद्याला चालना दिली. १०-१२ वर्षांत देशात रेल्वे इंजिनपासून सुई-टाचणीपर्यंत व चहा-कॉफीपासून छत्रीपर्यंत सारं उत्पादन होऊ लागलं. पण तत्त्वाने आंधळे झालेल्यांनी देशी छत्रीही नाकारली. ॲलोपॅथीची औषधं न घेता कित्येकांनी मृत्यू पत्करला. याला म्हणावं तत्त्वांधता. हा रोगही बरा न होणाराच. परिस्थितीमुळे होणारे, झालेले बदल कळायला मनाचा डोळसपणा लागतो.

रजपूत लोक शूर; पण तेही शौर्याच्या फाजील कल्पनेने अंध झालेले होते. पतीमध्ये शौर्य निर्माण करणे, हा रजपूत स्त्रियांचा धर्म मानला जाई. युद्धातून पळून येणाऱ्यांना त्या भ्याड समजत. एक नवविवाहित पती ऐन युद्धातून पत्नीच्या आठवणीने व्याकुळ होऊन घरी आला. तेव्हा तत्त्वांध पत्नीने त्याला स्नान घालण्याचं नाटक करून त्याच्याच तलवारीने त्याचं शिर धडावेगळं केलं. तत्त्वनिष्ठा आंधळी असल्यावर तिला चांगलं कसं आणि कुठून दिसणार? म्हणून विवेकाचे डोळे उघडे ठेवून जगणं, हेच खरं जीवन!

जगी आहे मोठी। संख्या आंधळ्यांची
गोष्ट बिरबलाची । खोटी नाही ॥ १
दिसतसे फक्त खुर्ची सत्तांधाना
काहीही दिसेना भलेबुरे ॥२
स्वार्थांधांना पिता । पुत्रही दिसेना
स्वार्थ साधताना । होती नीच ॥३
कामांधांना ध्यान । सदा वासनेचे
पवित्र नात्याचे । भान नाही ॥४
मदांध साऱ्यांना । कस्पट मानतो
कोणी न दिसतो। त्यास थोर ॥५
श्रद्धांध भाविका । फक्त देव दिसे
बळी तो देतसे। लेकराचा ॥६
धर्मांधांनी केले। जगाचे वाटोळे
अन्य धर्मी झाले । बळी त्यांचे ॥७
तत्त्वांधाना नाही । व्यवहारज्ञान
झाले नुकसान। संसाराचे ॥८
आंधळे न जाती। घेण्या उपचार
अंधत्वास दूर। करीनात ॥९
अंधांना वाटावे । प्रेम अंधत्वाचे
दुर्दैव जगाचे। खरे हेच ॥ १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071


## प्रबोधन

# जनसेवेमध्ये । शोधिले ईश्वरा

२६ ऑगस्ट १९१० या दिवशी जन्मलेल्या मदर टेरेसा यांना शांततेचा नोबेल पुरस्कार १९७९ मध्ये प्राप्त झाला आणि कोलकोता शहर हे दोन नोबेल पुरस्कार विजेत्यांच्या वास्तव्याने देशातच नव्हे, तर जगातील एकमेवाद्वितीयम असल्याचं सिद्ध झालं. त्याआधी विश्वकवी रवींद्रनाथ टागोरांना वाङ्मयसेवेबद्दल हा सन्मान १९३० मध्ये लाभला होता. मदर टेरेसा यांच्या चरित्रलेखिका ॲन सेबानी म्हटलं आहे, 'कविराज रवींद्रनाथ टागोर, चित्रमहर्षी सत्यजित रे आणि मदर टेरेसा या तिघांपैकी मदर टेरेसा ह्या आंतरराष्ट्रीय पातळीवर सगळ्यात जास्त विख्यात आहेत. त्यांनीच कोलकात्याला पुन्हा एकदा पश्चिमेत प्रसिद्धी मिळवून दिली आहे.'मदर टेरेसांनी गरिबांची जी सेवा-शुश्रूषा केली, तिला तोड नाही. केवळ कोलकात्यातच नव्हे, तर जगभर १३३ देशांतील आपल्या स्वतः स्थापन केलेल्या मिशनरीज ऑफ चॅरिटी या सेवासंघटनेच्या ४,५०० सिस्टर्सकडून मदर टेरेसांनी ज्या सेवाकार्याचा आदर्श जगासमोर ठेवला, तो मानव जातीच्या इतिहासातील असाधारण, प्रेरक आणि अनुकरणीय उपक्रम आहे. मदर टेरेसांच्या ६१० मिशनसतर्फे १२३ देशांत मरणासन्न एड्सग्रस्तांसाठी रुग्णालयं चालवली जातात; याखेरीज महारोगग्रस्त, क्षयाचे रुग्ण यांच्यासाठी आरोग्य सेवा केंद्रही उपलब्ध करून दिली आहेत. मिशनतर्फे अनाथालयं, शाळा आणि पालकांसाठी समुपदेशनाचेही उपक्रम चालवले जातात. भारत हा संतांचा देश आहे, असं म्हटलं जातं. पण एकाही भारतीय संताने एवढा दीर्घ काळ रंजल्या गांजल्यांची सेवा केली नाही. भगिनी निवेदिता म्हणतात, ह्यसाक्षात्काराचं आपण कौतुक करतो, तेच कौतुक सेवा करण्यांचंही आपण करू या. म्हणूनच हिंदू-धमार्ने अशा साक्षात्काराच्या ध्येयापासून खाली आलं पाहिजे.' या दृष्टीने आपण भक्तिविजय हे संतचरित्रावर आधारलेलं पुराण वाचलं, तर त्यात साक्षात्कार आणि चमत्कार या भुस्कटछाप दंतकथांचाच भरणा असलेला दिसून येतो. पण त्यात चिमूटभरही सेवाकार्याचा पत्ता नसतो.

मदर टेरेसा आपल्या सहभागी सेविकांना पावित्र्य, आज्ञाधारकपणा, गरिबीत राहाणं आणि तळागाळातील दीनदुबळ्यांची मोफत आणि अथक सेवा करणं, या चार तत्त्वाचरणांची शपथ घेत असत. त्यांच्या जीवनकार्याला धार्मिकतेची जोड नव्हती; पण थोर विचारवंत स्पिनोझा यांच्या त्या शिष्या असाव्यात. स्पिनोझा म्हणतात, 'ख्रिस्ताच्या भोवती जमलेल्या धार्मिक सिद्धान्ताच्या गोष्टी दूर करा. कारण अशा गोष्टींनी भांडणं वाढतात, पण ख्रिस्ताकडे निर्मळपणे पाहू तर मानवजात एकत्र आणण्याचं त्याच्यात सामर्थ्य आहे, हे समजतं.' मदर टेरेसांनी ज्या दीनदुबळ्यांची सेवा केली, त्यांची जात-पात, धर्म, वर्ण त्यांनी पाहिला नाही. मानवजात एकत्र आणणं, म्हणजे याहून दुसरं काय असतं? जागतिक कीर्तीचे अनेक सन्मान मदर टेरेसांना दिले गेले. त्यात सर्वोच्च स्थान १९७९मध्ये त्यांना मिळालेल्या नोबेल शांतता पुरस्काराला आहे. पण त्या पुरस्कार समारंभाला जाण्याचं त्यांनी आपल्या प्रसिद्धीपराङ्मुखतेला अनुसरून नाकारलं. पण नोबेल पुरस्काराची १,९२,००० डॉलर्सची रक्कम भारतातील गरिबांना देण्याची सूचना करून आपल्या औदार्याची जगाला ओळख करून दिली. याशिवाय मदर टेरेसा यांना पहिले पोप जॉन क्क्क यांच्या नावाचा शांतता पुरस्कार, फिलिपाईन्सचा रेमन मॅगसेसे पुरस्कार, द पेसेम इन टेरिस ॲवार्ड, ॲन ऑनररी कंपॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि अमेरिकेचे ऑर्डर ऑफ मेरिट, अल्बानियाचा राष्ट्रीय सुवर्ण सन्मान पुरस्कार, बाल्झन पुरस्कार आणि अल्बर्ट श्वाईत्सर आंतरराष्ट्रीय पारितोषिक असे अनेक देशांचे सन्मान दिले गेले. ज्या पुरस्कारांनी गरिबांना सहाय्य करता येतं तेच खरे पुरस्कार, असे आपल्या ध्येयाशी सुसंगत विचार त्यांनी व्यक्त केले. शांततेसाठी नोबेल पुरस्कार जाहीर झाल्यावर लोकांनी मदर टेरेसांना प्रश्न विचारला, 'जागतिक शांततेसाठी आम्ही काय करू शकतो?' त्यावर मदर टेरेसा म्हणाल्या, 'घरी जा आणि आपल्या कुटुंबीयांवर प्रेम करा!' आपल्या एका भाषणात त्या म्हणाल्या, 'केवळ गरीब देशातच नव्हे, तर जगात सर्वत्र जे दारिद्र्य आढळतं, त्यातील गरीब देशाचं दारिद्र्य दूर करणं सोपं आहे. पण पाश्चात्त्य देशातील दारिर्द्य दूर करणं फार कठीण आहे. एखाद्या भुकेल्या माणसाला अन्न दिलं की तो तृप्त होतो, याचं आपणाला समाधान वाटतं. पण पाश्चात्त्यांच्या स्पर्धामय जीवनातून एखादा बहिष्कृत झाला, भयभीत झाला, तर त्याच्या मनाचं दारिर्द्य कोण आणि कसं नाहीसं करणार? माज्यापुढे त्यामुळे मोठा गहन प्रश्न उभा ठाकतो. 'भारताने या थोर सेवामूर्तीला १९६२मध्ये पद्मश्री पदवी अर्पण केली. १९६९मध्ये जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय सामंजस्य पुरस्काराने सन्मानित केलं. भारताचा सर्वोच्च पुरस्कार भारतरत्न त्यांना अर्पण करण्यात येऊन देशाने त्यांचा उचित गौरवही केला. तरीही आत्मशोध घेताना त्या म्हणतात, 'मी श्रद्धाळू नाही. जगात जर देव नाही, तर आत्माही नाही आणि कुणी पूजनीयही नाही. मानवाची सेवा हेच अंतिम सत्य आहे!' जनसेवा हीच ईश्वरसेवा या तत्त्वापासून मात्र त्या कधी ढळल्या नाहीत.

मदर टेरेसांच्या । स्पर्शाने पुनित
जाहला भारत । सनातनी ॥१
धन्य सेवामूर्ती । मदर टेरेसा
सेवेविना आशा । अन्य नाही ॥२
दीन-दुबळ्यांना पोटाशी धरले
मन शांतविले। दुःखितांचे ॥ ३
आपपरभाव । मनामध्ये नाही
अनाथांची आई। धाव घेई ॥४
सेवासंप्रदाय । थोर उभारला
देशोदेशी नेला । साक्षेपाने ॥५
जनसेवेमध्ये शोधिले ईश्वरा
पूजी न ईश्वरा । मंदिरात ॥६
संतपणा तुम्ही । सेवाधर्मी शोधा
तुकोबांनी साधा। मंत्र दिला ७
तुकोबांची जणू । शिष्या शोभे छान
मदर भारतरत्न । पूजनीय ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पारंपारिक वाद्याचा वापर करत डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करा- आ. सचिन कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या वर्षापासून महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव हा राज्यउत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्यानुसार उत्सवा दरम्यान पारंपारिक वाद्याचा वापर करत डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करत उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करा असे आवाहन अक्कलकोट चे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. आमदार कल्याणशेट्टी यांनी आवाहन करताच उपस्थित श्री गणेश मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी देखील होकार दर्शविला आहे.

सोमवारी श्री क्षेत्र अक्कलकोट येथील श्री कमलाराजे चौकातील नगरपरिषदेच्या प्रियदर्शनी मंगल कार्यालयात अक्कलकोट उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालया अंतर्गत अक्कलकोट उत्तर-दक्षिण, दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग पोलीस ठाणे अंतर्गत अगामी श्री गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या सणांच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीत आमदार कल्याणशेट्टी हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सोलापूर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी उपस्थित होते. प्रारंभी उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावर यांनी या प्रसंगी प्रास्तविकातुन उपस्थित श्री गणेशमंडळ पदाधिकाऱ्यांना महत्वपूर्ण सूचना देऊन बैठकीचा हेतू स्पष्ट केले.



**विशेष प्रमाणपत्र देऊन सत्कार:-**
या बैठकीत श्री. स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने गत आषाढी वारीच्या काळात तंदुरुस्त बंदोबस्त अंतर्गत पोलीस बांधवांकारिता अन्नधान्य, भाजीपाला, फळे, दूध, दुग्धजन्य पदार्थ व भोजनव्यवस्थेकरिता सर्व सुविधा साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन श्री स्वामी समर्थ मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी व्यासपीठावर या बैठकीस तहसीलदार विनायक मगर पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, नगर नगरपालिकेचे कार्यालय अधीक्षक शैलेश बिराजदार महावितरणचे अभियंता राजू आडम, स. पो. नि. निलेश बागाव, वळसंग पोलीस ठाण्याचे स.पो.नि. अनिल सनगले हे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आ. कल्याणशेट्टी यांनी पर्यावरणपूरक व आरोग्यदायी श्री गणेशोत्सव साजरा करताना उत्सवातील उत्साह व आनंद कमी होऊ देऊ नका असे आवाहन करत पोलीस अधिकाऱ्यांना श्री गणेश मंडळ सहकार्य करतील अशी अपेक्षा व्यक्त केली. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी श्री गणेशोत्सव व्यवस्थित पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असून केवळ पोलिसांवर भार न टाकता गावापातळीवरील स्थानिक सर्वपक्षीय नेते व पदाधिकाऱ्यांनी देखील पुढाकार घेऊन हे दोन्ही उत्सव शांततेत व कायद्याच्या चौकटीत साजरे होण्यासाठी सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी गणेशोत्सवातील नियमावली व कायद्यांची माहिती दिली.

यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे, मुस्लिम समाजाच्या वतीने शुकूर शेख, चुंगी चे बालाजी माळगे, प्रा. राहुल रुही आदींनी मनोगत व्यक्त केले. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, शिवसेना तालुकाप्रमुख संजय देशमुख, आरपीआय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, भाजपा नेते महेश हिंडोळे, जेष्ठ नेते अश्पाक बळोरगी, दयानंद बिडवे, ननन कोरबू, फारूक बबर्ची, बुडन तांबोळी, मनसेचे मल्लिनाथ पाटील आदीसह गणेशउत्सव व ईद उत्सव समितीचे पदाधिकारी व पोलीस पाटील मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले तर स. पो. नि. वैभव स्वामी यांनी उपस्थिताना नो डी. जे. नो डॉल्बी ची शपथ देऊन उपस्थितांचे आभार मानले.

# महात्मां गांधी प्राणी संग्रहालयातील विविध विकास कामांचा पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते शुभारंभ

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिकेच्या महात्मा गांधी प्राणी संग्रहालयात विविध विकास कामांचा शुभारंभ ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हा नियोजन समिती तसेच कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत एन. टी.पी.सी.च्या निधीतून हे कामे हाती घेण्यात आली आहेत.



प्राणीसंग्रहालयातील विविध प्राण्यांच्या अधिवास व निवासस्थाने उभारण्यासाठी २.७९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यातून काळवीट अधिवास, बिबट्या क्राल परिसर, सिंह काल परिसर आणि मोरांचे निवासस्थान उभारण्यात येणार आहे. याशिवाय जिल्हा नियोजन समितीच्या पर्यटन स्थळ विकास व मुलभूत सुविधा अनुदानातून २.९५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होऊन प्राणीसंग्रहालयाच्या पशुवैद्यकीय केंद्राची उभारणी करण्यात आली आहे.

या विकास कामांमुळे शहरातील पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना मिळणार असून, शालेय विद्यार्थी, पर्यटक व नागरिकांसाठी हे स्थळ शैक्षणिक व मनोरंजनात्मक ठरणार असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमास आमदार देवेंद्र कोठे, सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, नियंत्रण अधिकारी तपन डंके, उपअभियंता अविनाश वाघमारे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश चौगुले, माजी महापौर श्रीकांचना यन्नम तसेच इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. आयुक्त डॉ. ओंबासे यांनी प्राणी संग्रहालयात उभारण्यात आलेल्या विविध विकास कामांची सविस्तर माहिती यावेळी दिली.

# खा. तटकरे आणि चाकणकर यांची किसन जाधव यांनी भेट घेत दिली अजित दादा चषक ट्रॉफी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीर्चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीर्चे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त नुकतेच ईच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तर निवड चाचणी व अजिंक्य कबड्डी स्पधेर्ची ट्रॉफी खासदार सुनील तटकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला प्रदेशाध्यक्ष तथा महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची पुणे मोशी येथील रामकृष्ण लॉन्स येथे भेट घेऊन शाल पुष्पगुच्छ तसेच अजित दादा चषक ट्रॉफी भेट देण्यात आले. प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांना लंडनमध्ये आयोजित लोकमत ग्लोबल इकॉनोमिकल कन्वेंशन मध्ये भारत भूषण या प्रतिष्ठित पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त खासदार सुनील तटकरे यांचा ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं किसन जाधव यांनी तटकरे यांचा विशेष सन्मान करून त्यांच्या पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सत्कार सोहळ्याप्रसंगी माजी आमदार विलास लांडे, सचिन गुत्तेदार, शरदराव शिंदे, आनंद गाडेकर महादेव राठोड आदींची उपस्थिती होती. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने पक्ष संघटन मजबुतीसाठी आपण सर्वांनी कामाला लागावे अशा सूचना देखील यावेळी प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी दिल्या.



# डॉल्बी मुक्त गणेश उत्सव साजरा करा- पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिनांक २७.०८.२०२५ ते ०६.०९.२०२५ या कालावधीत महाराष्ट्र राज्यात सर्वत्र "गणेश उत्सव" साजरा करण्यात येत आहे. गणेश उत्सव हा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साजरा आनंदाने व मोठ्या उत्साहाने साजरा होत असतो याचा मोठा ताण पोलीस विभागावर येत असतो. यामुळे या उत्सावात नागरीकांचे आचरण कसे असावे, गणेश मंडळानी कशा प्रकारे उत्सव साजरा करावा यासाठी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील शांतता समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची बैठक आयोजीत केली होती. सदरची बैठक ही नियोजन भवन येथील हॉलमध्ये संपन्न झाली.



या बैठकीसाठी सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, शांतता समितीचे सदस्य, मोहला समितीचे सदस्य, गणेश मंडळाचे अध्यक्ष, गणेश मुर्ती विक्रेते, डॉल्बी धारक हे हजर होते.

या बैठकीस मार्गदर्शन करताना अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी सर्व उपस्थितांना शांततेत परंतू मोठ्या उत्सहात गणेश उत्सव साजरा करण्यासाठी मार्गदर्शन केले. यामध्ये गणेश उत्सव हा सर्व सामान्यांचा सार्वजनिक उत्सव असून हा उत्सव साजरा करण्यासाठी गणेश मंडळांनी समाजाला फायदा होणारे गावामध्ये CCTV बसवणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान शिबीर आयोजीत करणअसे चांगले उपक्रम राबवावेत, तसेच उपस्थित जनममुदायाला या वर्षी गणेश उत्सव दरम्यान No DJ - No Dolby ही योजना राबवून डॉल्बी सिस्टममुळे लहान वृध्द यांना होणारे धोके, ध्वनीप्रदुषण याबाबत माहिती दिली. या बैठकीसाठी हजर असणारे शांतता समितीचे सदस्य व गणेश मंडळ यांनी त्यांच्या गावामध्ये व मंडळामध्ये ठङ्ग ञ्ख – ठङ्ग ञ्ङ्ग'८ ही योजना राबवत असल्याचे समक्ष आश्वासन दिले.

यावेळी अतुल कुलकणी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, शिरीष हुंबे, पोलीस उप-अधीक्षक (मुख्यालय), नामदेव शिंदे, पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा, सोलापूर ग्रामीण व जिल्ह्यातील गोपनियचे काम पाहणारे अंमलदार हजर होते.

# सोलापूरच्या ओंकार जाधवने केले स्वातंत्र्यदिनी किलिमांजारो शिखर सर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुळचा सोलापूरकर असलेला गियारीहक ओंकार रामचंद्र जाधव यांने १५ ऑगस्ट २०२५ रोजी आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माउंट किलिमांजारो (१९,३४० फूट) सर करून तिरंगा फडकवत स्वातंत्र्य दिन साजरा केला.

ओंकारने हे शिखर सर करून सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे, अशी माहिती एव्हरेस्ट वीर आनंद बनसोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

११ ऑगस्ट रोजी मोशी (टांझानिया) येथून मोहिमेला सुरुवात झाली. तब्बल ९० किमी अंतराची कठीण चढाई पार करून १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७:३० वाजता -१५ अंश तापमानात शिखर गाठण्यात आले.

शिखरावर पोहोचताच ओंकार यांनी भारताचा तिरंगा फडकावला तसेच अवयवदान मोहिमेचा संदेश देत त्याचे महत्त्वही अधोरेखित केले. ओंकार यांनी यापूर्वी एव्हरेस्ट बेस कॅम्प (२०२१) सर केला असून सह्याद्रीतील अनेक किल्ले सर करण्याचा अनुभव त्यांना आहे. 360 एक्सप्लोरर व एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

ही मोहीम 360 एक्सप्लोरर आंतरराष्ट्रीय साहसी पर्यटन संस्थेमार्फत आयोजित करण्यात आली होती. या संस्थेची स्थापना २०१७ मध्ये सोलापूरचे पहिले एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांनी केली असून आज ती जगभरातील गियारीहकांना साहसासाठी मार्गदर्शन केले जात आहे.

आफ्रिकेतील टांझानियामध्ये असलेले माउंट किलिमांजारो (१९,३४१ फूट) हे खंडातील सर्वात उंच पर्वत असून जगभरातील गियारीहकांचे स्वप्न आहे. हा पर्वत ज्वालामुखीजन्य असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून जवळपास ६ किमी आहे.

अनुभव नसल्यास किंवा चुकीच्या गतीने चढाई केल्यास उंचीशी जुळवून घेणे अवघड ठरते. त्यामुळेच योग्य अक्लिमटायझेशन मार्गदर्शन व शिस्तबद्ध नियोजन केल्याशिवाय किलिमांजारोवर चढाई करणे धोकादायक ठरू शकते. या पत्रकार परिषदेस अक्षया बनसोडे, ओंकार जाधव, वासंती जाधव, सत्यम जाधव आदी उपस्थित होते

**अनेकांना अशा आव्हानात्मक मोहिमांचा अनुभव घेता येतो : बनसोडे**

"ओंकारसारख्या तरुण गियारीहकांना किलिमांजारोसारख्या शिखरावर माड घेऊन जाण्याचा व मार्गदर्शन करण्याचा अभिमान आहे. ३६० एक्सप्लोररच्या माध्यमातून अनेकांना अशा आव्हानात्मक मोहिमांचा अनुभव घेता येतो, हेच आमचे ध्येय आहे." असे एव्हरेस्ट वीर आनंद बनसोडे यांनी सांगितले.

# नातेपुते येथील एस.एन.डी.स्कूलच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत यश

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** धनशैल्य विद्यालय, (गिरझणी) ता. माळशिरस येथे घेण्यात आलेल्या तालुका स्तरीय शालेय कराटे स्पर्धेमध्ये नातेपुते येथील एस.एन.डी.स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवून जिल्हास्तरीय कराटे स्पधेर्साठी निवड करण्यात आली. यशस्वी झालेले विद्यार्थी यामध्ये १४ वर्ष वयोगटामध्ये ४० किलो वजन गटात राजवर्धन चिंचकर प्रथम क्रमांक, १७ वर्ष वयोगटामध्ये ४५ किलो वजन गटात प्राची थोरात प्रथम क्रमांक, १७ वर्ष वयोगटामध्ये ६० किलो वजन गटात क्रांती लाटणेकर प्रथम क्रमांक, १७ वर्ष वयोगटामध्ये ५० किलो वजन गटात द्वितीय क्रमांक, १४ वर्ष वयोगटामध्ये ४० किलो वजन गटात राजवर्धन चिंचकर प्रथम क्रमांक, १४ वर्ष वयोगटामध्ये ३० किलो वजन गटात प्रणवी झगडे तुतीय क्रमांक, १४ वर्ष वयोगटामध्ये ३५ किलो वजन गटात सानवी मोरे तुतीय क्रमांक मिळविला त्याबद्दल वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख व संचालक मंडळ यांनी फेटा हार घालून सन्मान केला व जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेच्या निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याध्यापक संदीप पानसरे उप मुख्याध्यापक शकूर पटेल पी आर ओ मनोज राऊत शारीरिक शिक्षण विभागाच्या कोमल किर्दक उपस्थित होत्या. यावेळी बोलत असताना स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख म्हणाले की, शरीराच्या पोषणासाठी ज्याप्रमाणे निरोगी पोषक आहाराचे आवश्यकता असते त्याचप्रमाणे आपले जीवन सुधारण्यासाठी स्पर्धेत भाग घेणे खेळ खेळणे स्पर्धेत सहभागी होणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे कौशल्ये आणि क्षमता सुधारला जातात व शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदे होतात व्यक्तिमत्वाचा विकास वाढतो.



**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी

## अर्ज सादर करण्यास २६ तारखेपर्यंत मुदतवाढ


**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाच्यावतीने या वर्षीपासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा 'महाराष्ट्राचा राज्य उत्सव' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' च्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेस मुदतवाढ देण्यात आल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांना सहभागी होता यावे, यासाठी आता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख मंगळवार दि. २६ ऑगस्ट २०२५ असेल.

या स्पर्धेचे अर्ज https://ganeshotsav.pldmka.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जाणार आहेत.

या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांनी सहभागी होऊन तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय पारितोषिके जिंकण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण
४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे
८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी
१०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
१४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत)
१९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे
२५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी
२७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव
३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया
३२) किमानच्या विरूध्दार्थी
३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको
४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट
४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष
४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच
५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 31

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 5 | 9 | | | 3 | 7 |
| | 7 | 9 | | 3 | 2 | | 8 | |
| | | 8 | 7 | | | | | |
| 3 | | | | | 1 | 6 | 2 | |
| | 9 | | | | 6 | 3 | 7 | |
| 7 | 2 | | 3 | | | 1 | 5 | 8 |
| | | | | | 7 | 8 | 6 | 5 |
| | 8 | 7 | | 1 | | 2 | 4 | |
| | 5 | 4 | 6 | | | 7 | | |

